# बहुमोल

## कानमंत्र



# बहुमोल
## कानमंत्र

---

मेघा कानडे

सातम उद्योग™
www.satamudyogbooks.com

● ई-बुक आवृत्ती

● लेखिका : मेघा कानडे

● प्रकाशक : हेमंत स. साटम

● मुद्रक : साटम उद्योग
२०३, अमित इंड. इस्टेट, लालबाग, मुंबई-४०० ०१२.
८१६९९ ८४९२७


© सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

**विशेष आवाहन :**

☐ साटम उद्योगतर्फे नियमित प्रकाशित होणाऱ्या वेगवेगळ्या विषयांवरील माहितीपूर्ण पुस्तकात जे विचार व जे मतप्रदर्शन मांडले जाते त्याच्याशी प्रकाशक व विक्रेते सहमत आहेत असे मानू नये.

☐ सोबतच्या प्रकाशनातील कानमंत्र (टिप्स्) हे मार्गदर्शनपर व सर्वसाधारण स्वरुपाचे आहेत. ॲलर्जी किंवा तत्सम विकार असलेल्या व्यक्तींनी किंवा विशिष्ट आजारावर उपचार घेणाऱ्या रुग्णांनी या कानमंत्रांचा अवलंब करताना तारतम्य पाळावे किंवा तज्ज्ञ व्यक्तींचा सल्ला अवश्य घ्यावा. निष्काळजीपणाने उपाय योजू नयेत.

# प्रस्तावना

**आ**जचं दैनंदिन जीवन पूर्वीसारखं साचेबंद किंवा एकसुरी राहिलेलं नाही. घरातील आधुनिक साधनं, उपकरणं, गृहसजावटीच्या वस्तू, आधुनिक फर्निचर, संगणक, टि.व्ही, मोबाईल, दळणवळणाची आधुनिक साधनं या व अशा अनेक गोष्टींमुळे ते बहुआयामी झालं आहे. त्यामुळेच दैनंदिन व्यवहारात या आधुनिकतेचं भान जर आपल्याला नसेल तर अगदी साध्या गोष्टींमुळे आपला खोळंबा होऊ शकतो. वेळ, पैसा, श्रम या गोष्टी तर वाया जातातच शिवाय कधी कधी शारीरिक, मानसिक अथवा आर्थिक झळसुद्धा सोसावी लागते. महागड्या वस्तूंची निगा कशी राखावी हे माहित नसल्याने त्या निकामी ठरतात. विजेच्या उपकरणांची काळजी कशी घ्यावी, ती कशी हाताळावी हे माहित नसल्याने कामं अडून राहतात. कपडे, दागिने, घरातील झाडांच्या कुंड्या, आरसे, काचेच्या वस्तू, जरीची उंची वस्त्रे, पुस्तकं अशा अनेक गोष्टी आपल्याजवळ असतात पण त्यांची जपणूक नीट प्रकारे होत नाही किंवा त्या नीटपणे हाताळल्या जात नाहीत. पण या संबंधातल्या अगदी सोप्या गोष्टी माहीत असल्या तर दैनंदिन जीवनातील अनेक व्यत्यय दूर होऊ शकतात. 'बहुमोल कानमंत्र' या पुस्तकात अशा असंख्य लहानसहान गोष्टींबद्दलच्या उपयुक्त टिप्स् दिल्या आहेत. त्यांचा जाणीवपूर्वक अवलंब केल्यावर दैनंदिन जीवनातील अनेक कष्टातून आणि ताणतणावातून आपण मुक्त व्हाल हा विश्वास वाटतो. तेव्हा हे सुखी जीवनाचं मंत्र अवश्य आत्मसात करा!

**- मेघा कानडे**